# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**मानव्यविद्याशाखे अंतर्गत मराठी विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच. डी.)**
**पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा**

# ‘केशव सखाराम देशमुख यांचे काव्यलेखन आणि ललितलेखन: एक विवेचक अभ्यास’

**: संशोधक :**

**गजानन विठ्ठलराव नवघरे**
**बाभूळगाव ता.वसमत जि. हिंगोली**
**ईमेल navgharegajanan5@gmail.com**

**: संशोधक मार्गदर्शक:**

प्रा. डॉ.व्यंकटी पावडे
मराठी विभागप्रमुख
के.आर.एम.महिला कला, वाणिज्य
व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय, नांदेड - ४३१६०१

**: संशोधक केंद्र :**

**प्रतिभा निकेतन महाविदयालय, नांदेड.**

ऑगस्ट २०२३

# केशव सखाराम देशमुख यांचे काव्यलेखन आणि ललितलेखन : एक विवेचक अभ्यास

**प्रस्तावना :**

मराठी साहित्य आणि संशोधन ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे . काळानुरूप ते बदलत जाते. मध्ययुगीन आधुनिक व वर्तमान साहित्य अभ्यासांती असे लक्षात येते की, सामाजिक बदलाचा परिणाम साहित्यावर होत असतो. मराठी साहित्य त्यास अपवाद नाही . मराठी साहित्यालाही खूप मोठी परंपरा आहे . कालखंडनिहाय गणना केली असता साठोत्तरी काळातील मराठी साहित्य खूप बदललेले जाणवते . या बदलांचा परिणाम जसा इतर साहित्य प्रकारावर झाला तसाच तो कविता या वाङ्मय प्रकारावरही झालेला आहे . आधुनिक मानवी जीवनातील विविधांगी गोष्टीत समाजजीवन, आधुनिकता, खाऊजाचे धोरण, जागतिकीकरण, यांत्रिक क्षेत्रात झालेला बदल हे घटक इ. स. १९७५ नंतरच्या मराठी कवितेत दिसून येतात . कवितेचा या संशोधनानिमित्ताने शोध घेणे क्रमप्राप्त वाटते .

इ . स . १९७५ नंतर मराठी साहित्यात जे काव्य लेखन झाले त्यामध्ये ग्रामीण साहित्यात कृषी जीवन व शेतकरी व्यथा महत्त्वाची मानली जाऊ लागली . या कवितेने कृषी जीवनातील माणसाचा शोध घेऊन त्यांच्या भोवतीचे प्रश्न आणि त्या मागील समस्यांची कारणमीमांसा केली . या काळात असंख्य कवी लिहिते झाले . इ . स . १९९० नंतर एक मोठा प्रवाह या चळवळीशी जोडला गेला . त्यातील कवी केशव देशमुख हे एक होत . त्यांनी कृषक समाजाचे प्रश्न व्यथा,वेदना आणि समस्या आपल्या समग्र साहित्यातून मांडल्या . प्रामुख्याने केशव देशमुख यांच्या कविता आणि ललित लेखनामधून कृषी जीवनाचे अपरिचित प्रतिबिंब त्यांनी साहित्यातून मांडले . या जीवन जाणिवांचा शोध घेणे या संशोधनाचा प्रमुख हेतू आहे .

केशव सखाराम देशमुख यांनी कविता ललित आणि समीक्षा या वाङ्मय प्रकारात विपुल लेखन केलेले आहे . विविध प्रासंगीक लेखनातून त्यांनी केलेले सामाजिकचिंतन समाजाला

दिशा देणारे आहे . इ . स . १९९० नंतरची त्यांची कविता कष्टकरी माणसाच्या दुःखाभोवती फिरणारी आहे . कृषक माणूस हा त्यांच्या कवितेचा केंद्रबिंदू आहे . त्यांचे 'पाढा' (२००६ ), ' चालणारे अनवाणी पाय' ( २००८ ), 'अथक,' ( २०१० ) ' 'गाभा' ( २०१५ ), 'तंतोतंत, ( २०१८ ) आणि 'टिळा' इत्यादी काव्यसंग्रहामधून त्यांनी ग्रामीण भावविश्व वेगळेपणाने मांडलेले आहे .तसेच त्यांचे 'ग्रामशिदोरी,' ' विचारयात्रा,' 'गावशिवार' आणि 'शिवार' या ललित लेखनातील त्यांची भूमिका नव्या सामाजिक प्रश्नांना अधोरेखित करणारी आहे . त्यामुळे या साहित्याचा प्रस्तुत संशोधनाच्या निमित्ताने शोध घेणे महत्त्वाचे वाटले . म्हणून प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे .

**संशोधनाचे महत्त्व आणि गरज :**

एकूणच विश्वपातळीवरील मानवी जीवन आणि त्यांचे स्वभाव गुणधर्म एकच असून साहित्य आणि समाज जीवनाचा परस्पर संबंध अतूट अशा स्वरूपाचा राहिलेला आहे . व्यक्ती तेवढ्या प्रवृत्ती असल्या तरी मुळात मानवी मनात एक आदिम जाणीव समपातळीवर असतेच . केवळ आविष्काराच्या आणि शैलीच्या बाबतीत काही प्रमाणात वेगळेपण जाणवते एवढेच . प्रस्तुत संशोधनासाठी निश्चित केलेल्या लेखकाच्या काव्य आणि ललित लेखनाच्या जाणिवा वेगळया आहेत . हे गृहीत धरून त्यांच्या साहित्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे . त्यांच्या काव्यसंग्रहातील आणि ललितलेखसंग्रहातील अनुभवविश्व समाज जीवनाचे वास्तव निश्चितच वेगळेपण निश्चित करणारे आहे. हे कृषक समाज जीवनाचे वास्तव रसिक वाचक व अभ्यासकापर्यंत जावे म्हणून प्रस्तुत विषयाचे महत्त्व आणि गरज असणार आहे . चिंतनात्मक पातळीवरून त्यांच्या काव्य आणि ललित लेखनाचे विश्लेषण व्हावे यासाठी सदरील विषय मला महत्त्वाचा वाटला . म्हणून सदरील विषयाची निवड काही निवडक अभ्यासकांशी चर्चा करून मी जाणीवपूर्वक केलेली आहे .

सदरील संशोधनाची गरज आणि उपयोगिता निश्चितच शासनासह समाजातील वाचक,रसिक, अभ्यासकांना होणार आहे .विविध जाणिवांसह अनुभव विश्वाला आपल्या लेखनाच्या माध्यमातून उजागर करणाऱ्या समाजवास्तवामुळे अभ्यासकांच्या अनुभवकक्षा

विस्तारल्या जाऊ शकतात . म्हणून अशा प्रकारच्या संशोधनाची गरज असते .

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

प्रस्तुत संशोधनाच्या अभ्यासाच्या सोयीच्या दृष्टीने काही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आलेली आहेत ती खालीलप्रमाणे

१) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातील कृषी जीवनातील जीवनसंघर्षाचे वास्तव शोधणे .

२) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनात आलेल्या दारिद्र्य व अज्ञानामुळे शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाचा शोध घेणे .

३) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातील प्रतीक आणि प्रतिमांचा शोध घेणे.

४) केशव देशमुख यांच्या काव्य आणि लेखनातील भाषाशैलीचा शोध घेणे .

५) इ. स. १९९० नंतरच्या मराठी कवितेतील केशव देशमुख यांच्या कवितेचे स्थान शोधून ललित लेखनातील जीवन जाणिवांचा शोध घेणे .

६) केशव देशमुख यांच्या ललित लेखनाचे स्वरूप लक्षात घेऊन वेगळेपण स्पष्ट करणे .

७) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातून आलेल्या मानवी जीवन जाणिवांचा शोध घेणे .

८) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातून आलेल्या कृषी जीवनाचे वास्तव तसेच शेतकऱ्यांच्या जीवनातील जीवनवास्तवाचा शोध घेणे.

**संशोधनाची गृहितके :**

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनाचा अभ्यास करण्यासाठी काही महत्त्वपूर्ण गृहितकांची नोंद केलेली आहे ती खालीलप्रमाणे

१) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातून शेतकरी कृषक जीवनसंघर्षाचे वास्तव आलेले आहे .

२) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनात खेडी, खेड्यातील शेतकरी, शेती, श्रमकरी आणि त्यांच्या संघर्षासह विविधांगी दुःख आणि वेदना ही त्यांच्या लेखनाची बलस्थाने आहेत .

३) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातून मोठ्या प्रमाणात प्रतीक आणि प्रतिमांचा वापर झालेला आहे .

४) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनाची भाषाशैली ही प्रामुख्याने मराठवाडी बोली दिसून येते .

५) इ . स . १९९० नंतरच्या ग्रामीण साहित्यात केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनाचे एक वेगळे स्थान आहे .

६) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातून कृषी जीवनातील वास्तव तसेच शेतकऱ्याच्या जीवनातील दुःख आणि वेदना मोठ्या प्रमाणात आलेल्या आहेत .

७ ) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातून ग्रामीण जीवनजाणिवा विपूल प्रमाणात आलेल्या आहेत .

८ ) केशव देशमुख यांच्या काव्य आणि ललित लेखनातून ग्रामीण जीवनाचे चित्रण मोठ्या प्रमाणात आलेले आहे .

**संशोधन पद्धती :**

केशव देशमुख यांच्या काव्य लेखन आणि ललित लेखनाचा विवेचक अभ्यास प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, चरितात्मक, ऐतिहासिक आणि मुलाखत आदी संशोधन पद्धतीचा अवलंब करून प्रस्तुत संशोधनाला आकार रूप देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे .

**संकलन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी संकलन पद्धती ही प्रमुख आधार असणार आहे . संकलनाशिवाय संशोधन असंभवनीय आहे . म्हणून केशव देशमुख यांचे काव्य लेखन आणि ललित लेखन

तसेच त्यांच्या लेखनासंदर्भाने प्रसिद्ध झालेले समीक्षा लेखनाचे संकलन करून प्रस्तुत लेखकाची मुलाखत संशोधनाला पूर्णत्व येण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे . प्राथमिक आणि दुय्यम स्रोताबरोबर त्यांचे मूळ कवितासंग्रह मूळ ललितलेखसंग्रह तसेच संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिके, साप्ताहिके, दैनिके आणि पत्रिकांचाही स्रोत म्हणून उपयुक्त ठरणार आहे

**मुलाखत :**

प्रस्तुत लेखकाच्या काव्य लेखनातील व ललित लेखनातील समाजवास्तव आणि विविध पातळीवरचे अनुभव विश्व तपासण्यासाठी त्यांची मुलाखतही महत्त्वाची आहे. समकालीन परिस्थितीचे मुलाखती आधारे पडताळणी करून संशोधन काटेकोर होण्यासाठी चिंतनाच्या पातळीवरून मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे .

**विश्लेषणात्मक पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी मुलाखत,निरीक्षण,आकलन आणि पडताळणी तसेच प्रस्तुत काव्य आणि ललित लेखनाच्या अभ्यासाधारे लेखकाच्या चरित्रात्मक लेखनाधारे आणि समकालीन परिस्थितीचे आकलन करून प्रस्तुत विषयाची मांडणी विश्लेषणात्मक पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला जाईल .

**संशोधनाचा आराखडा :**

प्रस्तुत संशोधनाच्या अनुषंगाने केशव सखाराम देशमुख यांच्या काव्यलेखन व ललितलेखनाचा प्रारंभिक आराखडा खालीलप्रमाणे .

**प्रकरण पहिले : केशव सखाराम देशमुख व्यक्ती आणि वाङ्मय**

प्रस्तुत प्रकरणांमध्ये मराठी ग्रामीण साहित्याचे महत्त्वपूर्ण कवी साहित्यिक म्हणून प्रसिद्ध असलेल्या केशव देशमुख यांचे व्यक्तित्व आणि वाङ्मयीन कर्तृत्वाचा अभ्यास सदरील प्रकरणात करण्यात येणार आहे .

**प्रकरण दुसरे : नव्वोदत्तरी मराठी ग्रामीण कविता आणि केशव देशमुखांच्या कवितेचे स्वरूप**

सदरील प्रकरणांमध्ये इ . स . १९७५ नंतर मराठी साहित्यातच नव्हे तर ग्रामीण साहित्यातही बदलत्या जीवन जाणिवांचे चित्रण मोठ्या प्रमाणात आलेले आहे . नव्वोदत्तरी मराठी ग्रामीण कविता या पार्श्वभूमीवर केशव सखाराम देशमुख यांच्या काव्याचे आणि ललित साहित्याबरोबरच इतरही साहित्य प्रकारातून बदलत्या जीवन जाणिवांचे चित्रण आले का? या दृष्टिकोनातून त्यांच्या साहित्याचा अभ्यास सदरील प्रकरणात करण्यात येणार आहे .

**प्रकरण तिसरे : केशव देशमुख यांच्या काव्य लेखनातील जीवन जाणिवा :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये केशव देशमुखयांच्या 'पाढा (२००६)', 'चालणारे अनवाणी पाय (२००८), 'अथक (२०१०)', 'गाभा (२०१५)', 'टिळा (२०१७)' आणि 'तंतोतंत (२०१८)' या काव्यसंग्रहातील आशय, प्रतिमा आणि भाषाशैलीच्या माध्यमातून जीवनजाणिवांचा शोध घेऊन कवितेचे वेगळेपण स्पष्ट करण्यात येणार आहे .

**प्रकरण चौथे : केशव सखाराम देशमुख यांच्या ललित लेखनाचे स्वरूप :**

सदरील प्रकरणात केशव देशमुख यांनी लिहिलेल्या ललित लेखसंग्रहात 'ग्रामशिदोरी', 'विचारयात्रा', 'गावशिवार' व अन्य ललित साहित्यातून आलेल्या ग्रामीण जीवनविश्वाच्या वास्तवाचा अभ्यास सदरील प्रकरणांमध्ये केला जाणार आहे .

**प्रकरण पाचवे : केशव सखाराम देशमुख यांच्या काव्यलेखनाची आणि ललितलेखनाची भाषाशैली**

सदरील प्रकरणांमध्ये केशव देशमुख यांच्या काव्य लेखनाचा आणि ललितलेखनाचा अभ्यासांती त्यांच्या दोन्ही वाङ्मय प्रकारात आलेली मराठवाडी बोलीभाषा व तिची शैली कशा पद्धतीने अभिव्यक्त झालेली आहे . याचा शोध सदरील प्रकरणात घेण्यात येणार आहेत .

**प्रकरण सहावे : उपसंहार आणि निष्कर्ष :**

सदरील प्रकरणांमध्ये एकूण शोधप्रबंधाच्या अनुषंगाने अभ्यासांती शोधप्रबंधाच्या उपसंहाराची मांडणी करून निष्कर्षाची नोंदही करण्यात येणार आहे आणि शेवटी प्रस्तुत संशोधनासाठी उपयुक्त

ठरलेल्या मूळ साधनग्रंथासह संदर्भ ग्रंथांची यादी जोडून परिशिष्ट जोडण्यात येणार आहे .

**संदर्भ ग्रंथ:**


१) केशव देशमुख -' पाढा' साक्षात प्रकाशन, २००६ .

२) तत्रैव - 'चालणारे अनवाणी पाय' पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००८ .

३) तत्रैव - 'अथक' पद्मगंधा प्रकाशन , पुणे २०१० .

४) तत्रैव - 'गाभा' प्रतिमा प्रकाशन ,पुणे २०१५

५) तत्रैव - 'तंतोतंत' पद्मगंधा प्रकाशन , पुणे . २०१८ .

६) तत्रैव - ' टिळा', सकाळ प्रकाशन, पुणे .

७) तत्रैव - 'ग्रामशिदोरी' सकाळ प्रकाशन, पुणे .

८) तत्रैव - 'विचारयात्रा' सकाळ प्रकाशन, पुणे .

९) तत्रैव - 'गावशिवार' सकाळ प्रकाशन, पुणे .

१०) कुलकर्णी गो. म. - मराठी ग्रामीण साहित्य: परिसर आणि प्रवाह, मेहता पब्लिशिंग हाऊस , पुणे.

११) नलगे चंद्रकुमार (संपा.) - ग्रामीण मराठी वाङ्मयाचा इतिहास, अजब डिस्ट्रीब्यूटर्स, कोल्हापूर .

१२) इंगोले कृष्णा (संपा.) - ग्रामीण साहित्य आणि वास्तव, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे .

१३) पी . विठ्ठल - मराठी कविता समकालीन परिदृश्य, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.



**संशोधक**
**गजानन विठ्ठलराव नवघरे**

**संशोधन मार्गदर्शक**
**प्रा. डॉ. व्यंकटी पावडे**